# प्रेसनोट

दि. २९/१२/२०२३

**पोलीसांना सांगून गुन्ह्यामध्ये जामीन मिळवून देण्यासाठी व मदत करण्यासाठी लोकसेवकाकरीता पैशाची मागणी करणा-या खाजगी इसम वकीलावर लाच मागणी प्रकरणी कारवाई.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | जुन्नर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण, गु.र.नं. ५४६/२०२३ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम ७ अ. |
| तक्रारदार / फिर्यादी | श्री. रुपेश जाधव, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे. |
| आरोपी नाव व पत्ता | शुभम गजानन नायकोडी, वय ३० वर्ष, व्यवसाय - वकील, रा. जुन्नर, जि. पुणे. (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५,०००/- |
| पडताळणीमध्ये लाच मागणी रक्कम | २०,०००/- रुपये (वीस हजार रुपये) |

पडताळणी दिनांक :- ०९/१२/२०२३.

गुन्हा दाखल दिनांक :- २९/१२/२०२३.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे मुलाविरुद्ध जुन्नर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुरंन ५१५/२०२३, भा.दं.वि. कलम ३०७, ३४१, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल असून, सदर गुन्ह्यात त्यास अटक करण्यात आली आहे. सदर गुन्ह्याचा तपास जुन्नर पो स्टे कडील लोकसेवक करीत आहेत. दाखल गुन्ह्यात तक्रारदार यांचे मुलास लवकर जामीन मिळवून देण्याकरीता तक्रारदार यांचेकडे २५,०००/- रुपये लाचचे मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता, खाजगी इसम वकील शुभम नायकोडी यांनी तक्रारदार यांचेकडे जुन्नर पोलीस स्टेशन येथे दाखल गुन्ह्यात अटक करण्यात आलेल्या तक्रारदार यांचे मुलास लवकर जामीन मिळवून देतो याकरीता लोकसेवकाला २०,०००/- रुपये द्यावे लागतील असे सांगून पंचासमक्ष २०,०००/- रुपये (वीस हजार रुपये) लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाल्याने वरील प्रमाणे लाच मागणीचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अँन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.